# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## वित्त व लेखा विभाग

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
॥ यः क्रियावान् स पण्डितः ॥

फोन : २५६२१२४४/४५
ई-मेल: fao@unipune.ac.in

नवीन प्रशासन भवन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-४११ ००७.


**संदर्भ क्र.:** वित्त/२०२६-२७/६१७ **दिनांक :** ०७/०९/२०२६

**प्रति,**
**मा. प्राचार्य/मा. संचालक,**
विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,

**विषय :** एप्रिल, २०२६ परीक्षेच्या देयकांबाबत...

**मा. महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, एप्रिल - २०२५ च्या परीक्षेपासून सर्व विद्याशाखांच्या परीक्षेची देयके ऑनलाईन स्वरुपात भरण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांना कळविण्यात येते की, एप्रिल २०२६ परीक्षेची देयके ऑनलाईन स्वरुपात भरण्यासाठी दि. **०१/०९/२०२६** पासून बीओडी पोर्टलवर लिंक सुरु करण्यात आलेली आहे.

सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांनी एप्रिल-२०२६ परीक्षेची देयके ऑनलाईन स्वरुपातच भरणे अनिवार्य आहे. तसेच, परीक्षा देयक अंतिम सबमिट करण्यापूर्वी सर्व खर्च योग्य पध्दतीने नोंद झाला आहे, याची खात्री करुन देयक सबमिट करावे. परीक्षेचे देयक ऑनलाईनला एकदा सबमिट केल्यानंतर, कोणतीही तक्रार करता येणार नाही आणि त्यात कोणताही बदल करता येणार नाही, याची नोंद घ्यावी. परीक्षेची देयके ऑनलाईन स्वरुपात भरल्यानंतर त्याचे लेखापरीक्षण करुन परीक्षा संपल्यापासून सहा महिन्यांच्या आत वित्त व लेखा विभागात जमा करावयाची आहेत. ऑनलाईन स्वरुपात देयके भरण्यासाठी कमी कालावधी लागतो, त्यामुळे देयके वेळेत जमा करावीत.

तसेच, जी महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्था परीक्षेची देयके परीक्षा संपल्यानंतर सहा महिन्यानंतर जमा करतील, त्या देयकांवर **वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक क्र. १४३/२०२४ दि. २६/०६/२०२४** प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

**आपली विश्वासू,**

**सीएमए (डॉ.) चारुशीला गायके**
**वित्त व लेखा अधिकारी**